सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २०० | रविवार, दि. १२ एप्रिल २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

आजचे
अभीष्टचिंतन



ॲड. नम्रता हिंदुजा
अमळनेर



सौ. वैशालीताई कदम
अमळनेर



श्री. चेतन जैन
मानसी मेडिकल, अमळनेर

## दिनविशेष

१२ एप्रिल

- दिल्ली येथील लाल किल्ला बांधण्यात आला.
- छत्रपती शाहू महाराज (सातारा) आणि छत्रपती संभाजी महाराज (कोल्हापूर) यांच्यातील राज्याच्या सीमेचा वाद वारणा तहाने मिटला.
- प्रसिद्ध हिंदी चित्रपट अभिनेत्री लारा दत्ता ह्या विश्वसुंदरी बनल्या.

## गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

**स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!**



*अमळनेर : व्हॉल्व दुरुस्तीच्या कारणाने जलकुंभातून सोडण्यात आलेले पाणी.*

# व्हॉल्व झाला खराब लाखो लिटर पाणी बरबाद...

## पैलाड भागातील जलकुंभ पडला कोरडाठाक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील पैलाड भागातील टाकीचा व्हॉल्व्ह खराब झाल्याने सुमारे लाखो लिटर पाणी जमिनीवर सोडून द्यावे लागण्याची नामुष्की साईबाबा नगर मध्ये घडली.पैलाड भागात टाकीमधून पाणी खाली सोडण्यात येणारा मुख्य व्हॉल्व्ह मध्ये बिघाड झाला. त्यामुळे त्याला दुरुस्त करण्यासाठी व्हॉल्व्ह काढावा लागणार होता. व्हॉल्व्ह काढल्याने टाकीतील लाखो लिटर पाणी नाईलाजास्तव सोडून द्यावे लागले. इतक्या मोठ्या प्रमाणात पाणी सोडल्याने मंदिर आणि टाकी परिसरात मोठ्या प्रमाणात पाणी साचून चिखल झाला होता. परिसरात साचलेले पाणी बाहेर मार्ग काढताना कर्मचारी हतबल झाले होते.



> तांत्रिक बिघाड झाल्याने पाणी सोडल्याशिवाय पर्याय नव्हता. व्हॉल्व्ह दुरुस्ती करून टाकी भरून त्या भागाला नियमित पाणी पुरवठा केला जाईल
>
> **–सत्येम पाटील** , अभियंता , अमळनेर नगरपरिषद

> आमच्या भागात आठवड्यातून एकदाच पालिकेतर्फे पाणी पुरवठा होतो. त्यात व्हॉल्व नादुरुस्त झाल्याने लाखो लिटर पाणी वाया गेले. आता आमच्यावर पाण्यासाठी वणवण भटकंतीची वेळ आली आहे.
>
> **–किरण पाटील,** नागरिक, पैलाड

### भूमी सुपोषण राष्ट्रीय अभियान चळवळ

# जनजागर रथाला पाहून भारावले शेतकरी व ग्रामस्थ

## भूमीमातेचे महत्त्व पटवत जैविक शेतीला प्रोत्साहन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**




अमळनेर : भूमी सुपोषण राष्ट्रीय अभियान चळवळीच्या जनजागर रथाचे शुक्रवार, दि. १० एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता मुख्य अतिथी अमळनेरचे प्रांताधिकारी मयूर भंगाळे, उपविभागाचे पोलीस अधिकारी विनायक कोते, पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम, अमळनेर कृषी विभागाचे मंडल अधिकारी अविनाश खैरनार, उप कृषी अधिकारी योगेश वंजारी, दिनेश पाटील, अमोल कोठावदे तसेच मंगळग्रह सेवा संस्थेचे उपाध्यक्ष एस. एन. पाटील, खजिनदार गिरीश कुलकर्णी, ग्रीनरी कन्सल्टंट सुबोध पाटील यांच्या उपस्थितीत सुरवात झाली होती. या अभियान चळवळीचा जागर शनिवार, दि. ११ एप्रिलपासून अमळनेर तालुक्यातील सहा मंडळांतील १५६ गावांना भेट देत या रथाच्या माध्यमातून केला.भूमी सुपोषण राष्ट्रीय अभियान चळवळीचा जनजागर रथ अमळनेर तालुक्यातील मंगरूळ,लोंढवे,जानवे,उदयनगर व चोपडाई-कोंढावळ या गावात पोहचला.यावेळी जनजागर रथातून ध्वनिक्षेपकावरून भूमी सुपोषण अभियानाचे महत्त्व, कार्य व भूमी सुपोषण करण्यासंदर्भात सविस्तर माहिती तसेच अन्नदात्या भूमीमातेचे महत्त्व पटवत जैविक शेतीला प्रोत्साहन देणे कसे महत्त्वपूर्ण आहे, हे शेतकरी बांधवांना समजावले.तसेच त्यांच्या प्रश्नाचे निराकरण करण्यात आले.यावेळी ग्रामस्थांना माहितीपत्रक वाटप करण्यात आले. दिवसभरात साधारपणे एकूण ५ गावांना जनजागर रथाने भेट दिली .यासाठी महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाचे बहुमूल्य सहकार्य लाभले असून, ६ मंडळांतील एका प्रमुख गावात अशा एकूण ६ गावांत भूमीमाता पूजनाचा कार्यक्रमही होणार आहे.आपला परम पवित्र भारत देश कृषिप्रधान आहे. मात्र, सद्य:स्थितीत देशातील शेती, शेतकरी, शेतमजूर व कृषी उत्पन्न आदींची स्थिती रासायनिक खतांचा, कीटकनाशकांचा बेसुमार वापर झाल्याने दयनीय झाली आहे. आपल्या पूर्वजांनी पिढ्यानपिढ्या सेंद्रीय व सकस शेती करून त्यात पारंपरिक बियाण्यांचा वापर करून देश समृद्ध ठेवला होता. त्यामुळेच आपल्या मुला-बाळांचे आरोग्य सुदृढ व निरोगी राहत होते, हे विसरून चालणार नाही. त्यामुळे आपल्या देशातील कृषी क्षेत्राला गतवैभव व निरामयता प्राप्त करून देण्यासाठी विषारी व कुपोषित झालेल्या भूमीमातेला सुपोषित करणे अत्यंत आवश्यक आहे. या राष्ट्रव्यापी अभियानाच्या गंगेत न्हाऊन निघण्यासाठी प्रत्येक गाव-खेड्यांतील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होत या अभियानाचे महत्त्व वाढवत बळ द्यावे, असे आवाहन अक्षय कृषी परिवार व मंगळग्रह सेवा संस्था, अमळनेर यांनी केले आहे.

माता भूमिः पुत्रो अहं पृथिव्याः
भूमि सुपोषण एवं संरक्षण अभियान

श्री मंगलग्रह मंदिर
अमळनेर

# साने गुरुजी स्मारकाचे पावित्र्य राखण्यासाठी 'दामिनी' मैदानात

## दोन प्रेमीयुगुल पकडले; कारवाईनंतर केले पालकांच्या हवाली


**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहराच्या बाहेरील शांत परिसराचा गैरफायदा घेऊन अश्लील चाळे करणाऱ्या प्रेमीयुगुलांना अमळनेर पोलिसांनी चांगलाच धडा शिकवला आहे. गलवाडे रस्त्यावरील साने गुरुजी स्मारक परिसरात पोलिसांनी छापा टाकून दोन प्रेमी युगुलांना ताब्यात घेतले.

या कारवाईत दोन्ही तरुण मुलींना पालकांच्या ताब्यात देण्यात आले असून, संबंधित तरुणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.उन्हाळ्याच्या दिवसात दुपारी रस्त्यावर शुकशुकाट असतो. याच शांततेचा फायदा घेत अनेक प्रेमी युगुलं शहराबाहेरील मंदिरे, टेकड्या आणि स्मारकांच्या परिसरात बसण्यासाठी जातात. अशीच गर्दी साने गुरुजी स्मारक परिसरात होत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. या प्रकारांना आळा घालण्यासाठी पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांनी विशेष 'दामिनी पथकाची' नियुक्ती केली आहे.

शुक्रवारी (दि. १०) दुपारी एका जागृत नागरिकाने पोलिसांना फोन करून माहिती दिली की, गलवाडे रोडवरील साने गुरुजी स्मारक परिसरात काही तरुण-तरुणी अश्लील चाळे करत आहेत. माहिती मिळताच निरीक्षक निकम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक कविता ठाणगे, पोलीस कॉन्स्टेबल श्यामल पारधी, मोनिका पाटील आणि सुनील पाटील यांच्या पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली.दामिनी पथकाने घटनास्थळावरून दोन प्रेमी युगुलांना ताब्यात घेऊन पोलीस स्टेशनला आणले. तेथे त्यांना पोलिसी खाक्या दाखवण्यात आला. चौकशीअंती दोन्ही मुली अमळनेर शहरातीलच एका वरिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी तातडीने त्यांच्या पालकांना पाचारण केले. मुलींच्या भविष्याचा विचार करून त्यांना समज देण्यात आली आणि पालकांच्या ताब्यात देण्यात आले.मात्र, सार्वजनिक ठिकाणी गैरवर्तन केल्याप्रकरणी हर्षल किशोर पाटील (रा. आर्डी) आणि राज प्रवीण संदानशिव या दोन तरुणांविरुद्ध पोलीस कलम ११२ व ११७ नुसार कारवाई करण्यात आली आहे.

> ***अनेक मुले मुली शिकवणी, क्लासच्या नावाने पालकांशी खोटे बोलून घरातून निघून आपल्या प्रियजनांना भेटायला निर्जनस्थळी जातात. पालकांनी आपल्या मुलांकडे लक्ष ठेवावे. नागरिकांनी तातडीने दामिनी पथकाला माहिती द्यावी. गैरकृत्य करणाऱ्यांची गय केली जाणार नाही.***
>
> ***– दत्तात्रय निकम, पोलीस निरीक्षक अमळनेर***



# ज्यूस पिण्याच्या बहाण्याने दुचाकी चोरी

## आरोपी पोलिसांच्या ताब्यात; न्यायालयीन कोठडीत रवानगी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : ज्यूस प्यायला आला अन मोटरसायकल चोरून नेल्याची घटना ५ रोजी रात्री आठ वाजता स्टेट बँकेसमोर घडली समोर घडली. पोलिसांनी आरोपीला शोधून अटक केली आहे.

निलेश हिम्मत संदानशीव यांची मोटरसायकल क्रमांक एम एच १९ बी एल ६८७५ ही स्टेट बँकेसमोर ज्यूस च्या दुकानावर लावलेली असताना ज्यूस दुकानदाराने मी घरून चार्जिंग लाईट घेऊन येतो असे सांगून मोटरसायकल मागितली. चावी लावून ते मोटरसायकलला किक मारून सुरू करण्याचा प्रयत्न करत असताना मोटरसायकल सुरू झाली नाही तेव्हा एक जण आला व त्याने ज्यूस वाल्याला सांगितले की मला ज्यूस प्यायचे आहे. चावी मोटरसायकलला लावलेली असताना तो ज्यूस बनवायला लागला. थोड्यावेळात संदानशीव परत मोटरसायकल मागायला आला तेव्हा मोटरसायकल दिसली नाही. त्या अज्ञात इसमाने मोटरसायकल चोरून नेली होती. अमळनेर पोलिसात चोरीचा गुन्हा दाखल झाला होता.



पोलिस निरीक्षक दत्तात्रय निकम यांनी पथकाला तांत्रिक शोध घेऊन सीसीटीव्ही फुटेज तपासायला सांगितले. पोलिसांनी चौकशी केली असता ही मोटरसायकल सैय्यद याकूब सैय्यद रेहमान रा चोपडा हल्ली मुक्काम चुनाघाणी गंधलीपुरा याने चोरल्याचे निष्पन्न झाले. हेडकॉन्स्टेबल सुनील तेली , सूर्यकांत साळुंखे , प्रशांत पाटील , उज्वल म्हस्के , अमोल कर्डयीकर , राजेंद्र देशमाने ,मयूर पाटील यांनी तांत्रिक बाबी तपासून आरोपीला मोटरसायकल सह ताब्यात घेतले. दरम्यान आरोपीला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने आरोपीला न्यायालयीन कोठडी सुनावली असून आरोपीला जिल्हा कारागृहात रवाना करण्यात आले आहे.

### आरटीई प्रवेश प्रक्रिया

# सोडत जाहीर; लाखापेक्षा अधिक विद्यार्थ्यांना मिळणार प्रवेश

## निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांना पाठविले जाणार 'एसएमएस'

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पुणे : शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) राज्यातील खासगी शाळांतील २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेश प्रक्रियेसाठी काढण्यात आलेल्या सोडतीतून (लॉटरी) एक लाख ५ हजार ५८२ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर करण्यात आला आहे. त्यात सर्वसाधारण गटातील एक लाख ५ हजार २२९, तर दिव्यांग गटातील ५८२ विद्यार्थ्यांचा समावेश असून, ११ ते २० एप्रिल २०२६ दरम्यान संबंधित विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित करता येतील, अशी




माहिती प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी दिली.

'आरटीई' अंतर्गत राज्यातील ८ हजार ७०१ शाळांतील एक लाख १४ हजार २८५ जागा प्रवेशासाठी उपलब्ध झाल्या आहेत. या जागांसाठी दोन लाख ८९ हजार ३८५ अर्ज दाखल झाले. प्रवेशाच्या जागांपेक्षा अर्जाची संख्या जास्त असल्याने ६ एप्रिल रोजी सोडत काढण्यात आली. त्यातून एक लाख ५ हजार २२९ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर करण्यात आला आहे. तर ८६ हजार ३४ विद्यार्थ्यांची प्रतीक्षा यादी करण्यात आली आहे.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांना नोंदणीकृत मोबाईलवर प्रवेशासाठी एसएमएस पाठविण्यात येणार आहेत. परंतु पालकांनी केवळ 'एसएमएस'वर अवलंबून न राहता संकेतस्थळावरून सोडत तपासून प्रवेशासाठी निवड झाली आहे की नाही, याची माहिती घ्यावी.

सोडतीद्वारे निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी गटशिक्षणाधिकारी, प्रशासन अधिकारी यांच्याकडे जाऊन कागदपत्रांची पडताळणी समितीमार्फत पडताळणी करावी. पडताळणी समितीने प्रवेशपात्र विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी कागदपत्रांची तपासणी करून प्रमाणित केल्यानंतर विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश घेण्यासाठी ऑनलाईन प्रत उपलब्ध करून द्यावी, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

## संपादकीय

# माती परीक्षण – समृद्ध शेतीचा पाया आणि काळाची हाक

“उत्तम शेती, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ नोकरी” असे आपल्याकडे पूर्वापार म्हटले जाते. भारताच्या संस्कृतीचा आणि अर्थव्यवस्थेचा मुख्य आधार शेती आहे. मात्र, बदलत्या काळानुसार शेतीचे स्वरूप बदलले आणि त्यासोबतच आव्हानेही वाढली. वाढत्या लोकसंख्येची अन्नाची गरज भागवण्यासाठी आपण ‘हरित क्रांती’ घडवून आणली, रासायनिक खतांचा आणि कीटकनाशकांचा बेसुमार वापर केला. परिणामी, उत्पादनात सुरुवातीला मोठी वाढ झाली खरी, पण आज आपली ‘काळी आई’ म्हणजेच शेती आपली सुपीकता गमावून बसली आहे. जमिनीचा हा ढासळणारा पोत सुधारण्यासाठी ‘माती परीक्षण’ ही आता केवळ एक प्रक्रिया राहिलेली नसून, ती आधुनिक शेतीची आणि अस्तित्वाची ‘काळाची गरज’ बनली आहे.भारतात शेतीला ‘अर्थव्यवस्थेचा कणा’ मानले जाते, परंतु हा कणा आज काहीसा कमकुवत होताना दिसत आहे. त्याचे मुख्य कारण म्हणजे शेतीचा ढासळत चाललेला पोत.

पूर्वीच्या काळी निसर्गचक्र आणि जमिनीचा कस यांचा समतोल होता, मात्र आधुनिक काळात अधिक उत्पादनाच्या हव्यासापोटी आपण जमिनीवर रासायनिक खतांचा जो मारा केला आहे, त्याचे गंभीर परिणाम आता समोर येत आहेत. या पार्श्वभूमीवर, ‘माती परीक्षण’ ही केवळ तांत्रिक प्रक्रिया राहिलेली नसून, ती शेती वाचवण्यासाठीची ‘काळाची गरज’ बनली आहे.आपल्याला ताप आला की आपण डॉक्टरांकडे जाऊन रक्त तपासणी करतो आणि मगच औषधे घेतो. पण शेतीच्या बाबतीत आपण नेमके उलटे करतो. पीक कोणतेही असो, बाजारात उपलब्ध असलेली खते सर्रास वापरली जातात. यामुळे जमिनीतील अन्नद्रव्यांचे संतुलन बिघडते. जमिनीचा सामू बदलल्यामुळे जमीन क्षारपड किंवा नापीक होण्याच्या मार्गावर आहे. माती परीक्षण हे जमिनीच्या आरोग्याचे ‘हेल्थ कार्ड’ आहे, जे आपल्याला नेमके सांगते की मातीला नक्की कशाची भूक आहे.जमिनीला कोणत्या घटकाची गरज आहे (उदा. नत्र, स्फुरद, पालाश किंवा सूक्ष्म अन्नद्रव्ये), हे समजल्यामुळे खतांचा अनावश्यक खर्च टळतो. संतुलित अन्नद्रव्यांमुळे पिकांची वाढ जोमाने होते आणि उत्पादनाचा दर्जा सुधारतो.अति–खतांमुळे होणारे जमिनीचे आणि भूगर्भातील पाण्याचे प्रदूषण रोखता येते.जमिनीचा पोत दीर्घकाळ टिकून राहिल्यामुळे भविष्यातील पिढीसाठी शेती सुपीक राहते.दुर्दैवाने, अजूनही ग्रामीण भागात माती परीक्षणाबाबत म्हणावी तशी जागरूकता नाही. प्रयोगशाळांची कमतरता, नमुने घेण्याच्या चुकीच्या पद्धती आणि अहवाल मिळण्यास होणारा उशीर यामुळे शेतकरी या प्रक्रियेपासून दूर जातो.

अनेकदा ‘शेजारी जे खत टाकतोय, तेच मी टाकेन’ ही मानसिकता शेतीचे मोठे नुकसान करत आहे.शासनाने माती परीक्षण मोहिमेला गती देणे आवश्यक आहेच, पण त्यासोबतच शेतकऱ्यांनीही पुढाकार घ्यायला हवा. दर दोन ते तीन वर्षांनी आपल्या शेतातील मातीची तपासणी करणे हे ‘स्मार्ट’ शेतीचे लक्षण आहे.”माती वाचली, तरच शेती वाचेल आणि शेती वाचली तरच देश जगेल.”बदलत्या हवामानात आणि वाढत्या महागाईत शेती परवडणारी करायची असेल, तर विज्ञानाची जोड घेण्याशिवाय पर्याय नाही. माती परीक्षण हा त्या विज्ञानाचा पहिला आणि सर्वात महत्त्वाचा टप्पा आहे. भारत सरकारने ‘मृदा आरोग्य पत्रिका’ योजना सुरू करून शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचे आरोग्य तपासण्याची संधी दिली आहे. ‘स्वस्थ धरा, खेत हरा’ हे या योजनेचे ब्रीदवाक्य आहे. मात्र, अजूनही अनेक शेतकरी या कार्डचा वापर केवळ कागद म्हणून करतात. या माहितीचा प्रत्यक्ष वापर शेतात होण्यासाठी कृषी सहाय्यक आणि शेतकरी गट यांनी एकत्र काम करणे गरजेचे आहे.माती परीक्षण मोहिमेत प्रयोगशाळांची उपलब्धता आणि अहवाल मिळण्यास होणारा विलंब हे मोठे अडथळे आहेत. यावर उपाय म्हणून फिरत्या माती परीक्षण प्रयोगशाळा वाढवणे आणि गावपातळीवर सुशिक्षित तरुणांना माती परीक्षणाचे प्रशिक्षण देऊन स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करणे आवश्यक आहे. डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून मृदा आरोग्य पत्रिकेची माहिती मोबाईल ॲपवर उपलब्ध करून दिल्यास शेतकऱ्यांना खतांचे नियोजन करणे सोपे जाईल.आजचे युग हे विज्ञानाचे युग आहे. शेतीमध्ये जोपर्यंत आपण विज्ञानाची आणि तंत्रज्ञानाची जोड देत नाही, तोपर्यंत शेती फायदेशीर ठरणार नाही. माती परीक्षण हा त्या विज्ञानाचा पाया आहे. आपली माती ही केवळ ‘धुळ’ नसून ते एक जिवंत अस्तित्व आहे. जर आपण मातीचे पोषण केले, तरच माती आपले आणि आपल्या पुढील पिढीचे पोषण करेल.येणाऱ्या काळात हवामान बदलाचे संकट गडद होत आहे. अशा वेळी कमी पाण्यात आणि कमी खर्चात चांगले उत्पन्न घ्यायचे असेल, तर माती परीक्षण करणे हीच ‘काळाची हाक’ आहे. प्रत्येक शेतकऱ्याने आपला शेतीचा हंगाम सुरू करण्यापूर्वी आपल्या मातीची तपासणी करण्याचा संकल्प केला, तरच ‘सुजलाम सुफलाम’ भारताचे स्वप्न खऱ्या अर्थाने साकार होईल. “चला, मातीचे आरोग्य जपूया आणि समृद्धीचा मार्ग सुकर करूया!”

# पु. भा. भावे : मराठी साहित्यातील धगधगते अग्निकुंड

जन्मदिन विशेष

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मराठी साहित्याला आपल्या लेखणीने धार चढवणारे आणि विचारांच्या स्पष्टतेने वाचकांच्या मनात क्रांतीची ठिणगी टाकणारे अष्टपैलू साहित्यिक पुरुषोत्तम भास्कर भावे ऊर्फ पु. भा. भावे. त्यांच्या जन्मदिनानिमित्त (१२ एप्रिल १९१०) त्यांच्या जाज्वल्य जीवनप्रवासाचा आणि साहित्याचा घेतलेला हा धांडोळा.

पु. भा. भावे यांचा जन्म विदर्भातील यवतमाळ जिल्ह्यातील उमरखेड येथे झाला. त्यांचे शिक्षण नागपूरमध्ये झाले. भावे यांचे व्यक्तिमत्व हे केवळ साहित्यापुरते मर्यादित नव्हते, तर ते एक प्रखर विचारवंत आणि झुंजार पत्रकारही होते. स्वांतत्र्यवीर सावरकर यांच्या विचारांचा त्यांच्यावर मोठा पगडा होता, जो त्यांच्या साहित्यातून वेळोवेळी प्रकर्षाने जाणवतो.भावे यांच्या लेखणीत एक प्रकारची धग होती. त्यांचे शब्द वाचताना अंगावर शहारे येतात. त्यांच्या साहित्याची काही प्रमुख वैशिष्ट्ये संस्कृतप्रचुर पण ओघवती आणि तडफदार भाषाशैली.त्यांच्या कथा–कादंबऱ्यांतून प्रखर राष्ट्रवाद आणि हिंदुत्वाचा पुरस्कार दिसतो.सडेतोडपणाः अन्याय आणि ढोंगीपणावर त्यांनी आपल्या ‘आदेश’ सारख्या मासिकातून सडकून टीका केली. भावे यांनी कथा, कादंबरी, नाटक आणि ललित अशा सर्वच क्षेत्रांत मोलाची भर घातली.व्याध, विषकन्या, आकुलता, रक्ताची ओढ या त्यांच्या साहित्य प्रकारातील प्रसिद्ध कादंबरी, कथासंग्रह जसे प्रलय, सतरावे वर्ष, फुलवेची, नकुला. नाटके महारथी कर्ण, स्वामिनी, विषकन्या.ललित/वैचारिक साहित्य विठ्ठलाची पाऊले, विखुरलेले मोती.पु. भा. भावे यांनी ‘आदेश’ नावाचे साप्ताहिक सुरू केले. या साप्ताहिकाच्या माध्यमातून त्यांनी तत्कालीन राजकीय आणि सामाजिक परिस्थितीवर अत्यंत जहाल आणि मार्मिक भाष्य केले. त्यांच्या अग्रलेखांनी अनेकदा प्रशासकीय आणि राजकीय वर्तुळात खळबळ उडवून दिली होती. १९७७ साली पुण्यामध्ये झालेल्या ५२ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषवले. त्यांच्या भाषणातूनही त्यांनी मराठी भाषेचा स्वाभिमान आणि साहित्याची सामाजिक जबाबदारी यावर परखड मते मांडली होती.पु. भा. भावे यांचे साहित्य केवळ करमणुकीचे साधन नव्हते, तर ते समाजाला जागे करणारे शस्त्र होते. त्यांच्या साहित्यातील पात्रे जिद्दी, करारी आणि तत्त्वासाठी लढणारी असतात. मराठी साहित्यातील ‘शब्दप्रभू’ आणि ‘अग्निकुंड’ म्हणून त्यांना कायम ओळखले जाईल.”शब्दांना तलवारीची धार असते, हे पु. भा. भाव्यांनी आपल्या लेखणीतून जगाला दाखवून दिले.”त्यांच्या जन्मदिनी या महान शब्दाधिपतीला कोटी कोटी प्रणाम!



# डंपर चोरीचे ‘मध्य प्रदेश’ कनेक्शन!

## गांधलीतील चोरीचा इंदूरमध्ये उलगडा

### पोलिसांच्या कारवाईने गुन्हेगारांचे धाबे दणाणले

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : गांधली शिवारातील पेट्रोल पंपावरून लंपास केलेले १५ लाख रुपयांचे डंपर चक्क मध्य प्रदेशातील इंदोर येथे तोडलेल्या (स्क्रॅप) अवस्थेत आढळून आले. तालुक्यातून चोरीला गेलेल्या डंपर प्रकरणाचा छडा लावण्यात अमळनेर पोलिसांना मोठे यश आले आहे. या आंतरराज्य टोळीचा पर्दाफाश करत पोलिसांनी चोरट्यांची नावे निष्पन्न केली असून, एका संशयिताला इंदोरमधून बेड्या ठोकल्या आहेत.

हिंगोणे येथील रहिवासी निलेश संजय पाटील यांचे १५ लाख रुपये किमतीचे डंपर (एम.एच. ४८एजी ८३०७) ३१ तारखेला रात्री गांधली येथील पेट्रोल पंपावर उभे होते. रात्री साडेअकरा वाजेच्या सुमारास चोरट्यांनी हे अजस्त्र वाहन शिताफीने लंपास केले होते. भरवस्तीतून आणि मुख्य रस्त्यावरून एवढे मोठे डंपर चोरीला गेल्याने पोलीस प्रशासनासमोर मोठे आव्हान उभे राहिले होते.

घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तांत्रिक तपासाची चक्रे फिरवली. डंपरच्या मागावर असताना पोलिसांना त्याचे धागेदोरे थेट मध्य प्रदेशात मिळत गेले. तपासादरम्यान पोलिसांचे एक पथक इंदोरला रवाना झाले. तेथे एका अडगळीच्या ठिकाणी हे डंपर पूर्णपणे तोडलेल्या आणि तुकडे केलेल्या अवस्थेत पोलिसांना मिळून आले. पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने चोरट्यांनी वाहनाची मोडतोड केली होती.पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांनी पोलीस उपनिरीक्षक शरद काकळीज, पोलीस उपनिरीक्षक नामदेव बोरकर, हेडकॉन्स्टेबल मिलिंद सोनार, विनोद संदानशिव, निलेश मोरे, सिद्धांत शिसोदे, प्रशांत पाटील यांना तपासाला पाठवले. डंपर पातोंडा मार्गे पुढे गेले मात्र नेमके कुठे गेले याची माहिती मिळेना. ठिकठिकाणी वेगवेगळ्या रस्त्यावर सीसीटीव्ही फुटेज आणि इतर तांत्रिक माहिती घेऊन पोलीस डंपरचा मागोवा घेत मध्यप्रदेश गुजरात व परत मध्यप्रदेशात पोहचले. एक दोन नव्हे तर तब्बल नऊ दिवस पोलीस मध्यप्रदेशात मुक्कामी होते.अखेर पोलिसांनी खबरी मार्फत माहिती काढली असता त्यांना खाजू खान चांद खान रा तेजाजी नगर इंदोर याने गोदाम भाड्याने घेतले असून त्याठिकाणी चोरलेली अथवा इतर मोठी वाहने आणून ट्रक बॉडी मेकर्स मध्ये त्यांचे भाग वेगळे केले जात असल्याचे समजले.

पोलिसांनी छापा टाकला असता त्यांना चोरीस गेलेल्या ट्रकचे भाग कापून वेगळे झाल्याचे दिसले. पोलिसांनी खाजू खान याला अटक करून डंपर चे सर्व भाग केबिन, चेसिस, बॉडी, एअरटँक, डिझेल टैंक सर्व जमा करून दुसऱ्या एका ट्रक मध्ये अमळनेर पोलीस स्टेशनला आणले आहे. खाजू खान यांच्याकडून तिन्ही चोरट्यांची नावे निष्पन्न केली असून लवकरच तिघांना अटक करण्यात येईल असे पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांनी सांगितले आहे.



*अमळनेर : गांधली शिवारातील पेट्रोल पंपावरून चोरलेल्या डंपरची इंदूरमध्ये तोडलेल्या अवस्थेतील स्थिती.*

# मेवाडचा झंझावात: महाराणा संग

जन्मदिन विशेष

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

राजपुतान्याच्या मातीतील शौर्य, त्याग आणि अदम्य साहसाचे प्रतीक म्हणजे महाराणा संग्रामसिंग (राणा संग). भारतीय इतिहासात ज्या काही योद्ध्यांनी आपल्या तलवारीच्या जोरावर परकीय आक्रमकांना सळो की पळो करून सोडले, त्यात राणा संगांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते.राणा संग यांचा जन्म १२ एप्रिल १४८२ (काही संदर्भांनुसार १४७२) रोजी मेवाडच्या सिसोदिया राजवंशात झाला. ते महाराणा रायमल यांचे पुत्र आणि विख्यात महाराणा प्रताप यांचे आजोबा होते. त्यांच्या शौर्यामुळे त्यांना ‘हिंदूपत’ (हिंदूंचा रक्षक) ही पदवी बहाल करण्यात आली होती.राणा संग यांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांचे शरीर म्हणजे पराक्रमाचा जिवंत दस्तऐवज होते. युद्धाच्या मैदानात त्यांच्या शरीरावर तब्बल ८० जखमा होत्या.त्यांनी एका युद्धात आपला एक डोळा गमावला होता.दुसऱ्या एका युद्धात त्यांचा एक हात निकामी झाला होता.एका लढाईत त्यांनी आपला एक पाय गमावला होता.इतक्या शारीरिक व्याधी असूनही त्यांचा उत्साह आणि शत्रूला भिडण्याची वृत्ती तसूभरही कमी झाली नव्हती.राणा संगांनी आपल्या कारकिर्दीत अनेक बलाढ्य सत्तांना धूळ चारली. त्यांनी उत्तरेतील राजपुतांना एकत्र करून एक मोठी शक्ती निर्माण केली होती.खातोलीचे युद्ध इब्राहिम लोदी (दिल्लीचा सुलतान) विरुद्ध राणा संगांचा निर्णायक विजय,गागरोनचे युद्ध यात महमूद खिलजी (माळव्याचा सुलतान) खिलजीचा पराभव आणि कैद करण्यात आली होती तर इडरचे युद्ध यात मुझफ्फर शाह (गुजरातचा सुलतान)चा पराभव आणि मेवाडचे वर्चस्व प्रस्थापित झाले.१५२७ मध्ये मुघल सम्राट बाबर आणि राणा संग यांच्यात झालेल्या खानवाच्या युद्धाने भारताचा इतिहास बदलला.बाबरकडे आधुनिक तोफखाना होता, तर राणा संगांकडे पारंपारिक शौर्य आणि हत्तींचे सैन्य.राणा संगांनी सर्व राजपूत राजांना एका झेंड्याखाली आणले होते.युद्धात जखमी झाल्यामुळे त्यांना बेशुद्ध अवस्थेत रणांगणातून हलवावे लागले, ज्यामुळे सैन्यात गोंधळ उडाला आणि हा विजय थोडक्यात हुकला.राणा संग केवळ एक योद्धा नव्हते, तर ते एक तत्वनिष्ठ राजे होते. शत्रूला शरण आलेल्यांना जीवनदान देणे आणि आपल्या प्रजेचे रक्षण करणे हे त्यांचे ब्रीद होते. त्यांच्या याच संस्कारांतून पुढे महाराणा प्रताप यांच्यासारखा महान योद्धा घडला.”ज्यांच्या अंगावर ८० जखमा होत्या, तरीही ज्यांचा आत्मा अभेद्य होता, अशा मेवाडच्या या महान पुत्राला मानाचा मुजरा!”



# शॉर्टसर्किटमुळे गांधली येथे शेतात आग

## मका जळून खाक, ५० हजारांचे नुकसान

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील गांधली येथे विजेच्या तारांमध्ये झालेल्या शॉर्टसर्किटमुळे लागलेल्या आगीत दोन शेतकऱ्यांच्या शेतातील मका जळून खाक झाला. ही घटना ९ एप्रिल रोजी दुपारी घडली असून सुमारे ५० हजार रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, गांधली येथील सुधाकर देशमुख व योगेश गुलाब देशमुख यांच्या गट क्रमांक १०मधून विद्युत तारा गेल्या आहेत. विजेच्या खांबावरील तारांमध्ये शॉर्टसर्किट होऊन ठिणगी पडली आणि शेतातील सुक्या मक्याच्या कणसांना व चाऱ्याला आग लागून काही वेळातच मोठे नुकसान झाले.



या आगीत दोन्ही शेतकऱ्यांच्या शेतातील अंदाजे २२ ते २५ क्विंटल मका जळून खाक झाला. घटनेची माहिती मिळताच गावातील रमेश न्हावी, भूषण देशमुख, बापू माळी आणि भूषण पारधी यांनी तात्काळ धाव घेऊन आग विझवण्याचा प्रयत्न केला. ग्रामस्थांच्या तत्परतेमुळे आग इतर शेतांमध्ये पसरण्यापासून रोखण्यात यश आले.दरम्यान, या घटनेमुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून संबंधित यंत्रणांनी तातडीने पंचनामा करून वीज मंडळ व शासनामार्फत नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी करण्यात येत आहे. या घटनेमुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये चिंता व्यक्त होत असून विद्युत तारा व खांबांची वेळोवेळी दुरुस्ती करण्याची मागणी जोर धरत आहे.

# जळगावच्या अपर पोलीस अधीक्षकपदी संदीप गावित

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : गृह विभागाने नुकत्याच जाहीर केलेल्या पदोन्नती व पदस्थापनेच्या आदेशानुसार संदीप रघुनाथ गावित यांची जळगावच्या अपर पोलीस अधीक्षकपदी नियुक्ती करण्यात आली आहे.संदीप गावित हे नाशिक विभागात कार्यरत होते. त्यांची पोलीस उपअधीक्षक/सहाय्यक पोलीस आयुक्त पदावरून पोलीस अधीक्षक/पोलीस उपआयुक्त (अ–संवर्ग) पदावर तात्पुरती पदोन्नती करण्यात आली आहे.गावित यांनी यापूर्वी जळगाव उपविभागीय पोलीस अधिकारी म्हणून काम पाहिले आहे. काही महिन्यांपूर्वीच त्यांची जळगावहून भुसावळ येथे बदली झाली होती. आता पुन्हा पदोन्नतीसह ते जळगाव जिल्ह्यात वरिष्ठ पदावर परतले आहेत.संदीप गावित यांच्या नियुक्तीमुळे जळगाव पोलीस प्रशासनाला एक अनुभवी अधिकारी मिळाला आहे.



# गर्भवती पत्नीला सोडून तरुणाची आत्महत्या

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : मारवड येथील रहिवासी गौरव सुरेश पाटील (वय ३०) याने दि. ९ रोजी सकाळी आपले राहते घरी घराच्या छताला साडीने गळफास घेत आत्महत्या केल्याची घटना घडली. त्याचे वडील सुरेश पाटील हे मॉर्निंग वॉकला गेलेले असताना गौरवने घरातील मागच्या खोलीत गळफास घेतला.

शेजाऱ्यांच्या मदतीने त्यास खाली उतरवून अमळनेर ग्रामिण रुग्णालयात हलविले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. सदर प्रकरणी विजय भदाणे यांनी मारवड पोलिसात दिलेल्या खबरीवरून अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास पोहेकॉ. शरीफ पठाण हे करीत आहेत. दरम्यान मयत गौरवचे वडील सुरेश पाटील हे मूळचे चिंचोली येथील असून मारवड येथे वैद्यकीय व्यवसाय करीत असल्याने डॉ. साठे म्हणून परिचित होते. तर गौरवचा आठ महिन्यांपूर्वीच विवाह होऊन तो मारवड संस्थेत नोकरीवर लागला होता. पत्नी चार महिन्यांची गर्भवती असताना त्याने आपले जीवन संपविल्याने कुटुंबास मोठा धक्का बसला आहे. त्याच्या पश्चात पत्नी, आई–वडील, एक भाऊ असा परिवार आहे.

# विश्व नवकार महामंत्र दिनानिमित्ताने सामूहिक जप

## ‘णमो अरिहंताणं’ या मंत्र जपाने परिसर भक्तिमय

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : विश्व कल्याणाच्या उद्देशाने विश्व नवकार महामंत्र दिनानिमित्त सकल जैन बांधवांच्या वतीने सकाळी ८ ते ९ या वेळेत भांडारकर कंपाउंड येथील भवनात सामूहिक नवकार महामंत्र जपाचे आयोजन करण्यात आले. ‘णमो अरिहंताणं’ या पवित्र मंत्राच्या जपाने परिसर भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाला.

या उपक्रमात जैन समाजातील महिला, पुरुष, युवक–युवती तसेच ज्येष्ठ नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. विश्व शांती, सद्भावना आणि सर्वांच्या कल्याणासाठी करण्यात आलेल्या या जपातून सकारात्मक ऊर्जा निर्माण झाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. रवींद्र जैन आणि नितीन शहा यांनी नवकार महामंत्राचे महत्त्व व त्यामागील आध्यात्मिक संदेश याविषयी थोडक्यात मार्गदर्शन केले. त्यानंतर सर्वांनी शिस्तबद्ध पद्धतीने एकसुरात मंत्रोच्चार करत सामूहिक जप केला. या उपक्रमामुळे एकात्मता आणि अध्यात्मिकतेचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सकल जैन बांधवांनी परिश्रम घेतले.



**अमळनेर : जैन बांधवांकडून विश्व नवकार मंत्र सामुहिक जप.**

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :– आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई–मेल : globalmahatej@gmail.com



# कृषी सेवक ते सहाय्यक आयुक्त...

## अकोल्याच्या लेकीची यशस्वी झेप; संघर्षातून मिळविले यश

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अकोल्याच्या मुलीने राज्यभरात अकोल्याच्या इतिहासाच्या पानात नाव कोरले आहे. नुकत्याच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२४ चा निकाल ८ एप्रिल रोजी जाहीर झाला. अकोल्याच्या प्रगती जगताप यांनी उल्लेखनीय यश मिळवत सहाय्यक आयुक्त/मुख्याधिकारी (गट-अ) या पदासाठी निवड मिळविली आहे. अनुसूचित जातीतील महिलांमध्ये राज्यात अव्वल येत त्यांनी अकोल्याचे नाव राज्यभर उज्ज्वल केले आहे. साध्या कुटुंबातून आलेल्या प्रगती जगताप यांचा हा प्रवास अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.



**संकटांवर मात करत पुढे वाटचाल**

प्रगती जगताप या नागपूर जिल्ह्यातील कळमेश्वर पंचायत समितीत सहाय्यक गटविकास अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. २०२० च्या एमपीएससी परीक्षेतून त्यांची या पदावर निवड झाली होती. मात्र, त्यांचे ध्येय यापेक्षा मोठे होते. २०१७ पासून त्यांनी स्पर्धा परीक्षेची तयारी सुरू केली. अत्यंत सामान्य परिस्थितीतून त्यांनी कठोर परिश्रम करत २०१८ मध्ये कृषी सेवक म्हणून नोकरी स्वीकारली.

नोकरी करतानाच अभ्यासाची कास धरत त्यांनी उच्च अधिकारी होण्याचे स्वप्न मनात जपले. एमपीएससीच्या राज्यसेवा मुख्य परीक्षेत त्यांनी तब्बल सात वेळा यश मिळवत मुलाखतीपर्यंत मजल मारली. सातत्य, चिकाटी आणि कठोर परिश्रम यांच्या जोरावर त्यांनी अखेर राज्यसेवा परीक्षेत यश मिळवत सहाय्यक आयुक्त/मुख्याधिकारी पदापर्यंतचा प्रवास पूर्ण केला. या दरम्यान, प्रगती जगताप यांच्या आयुष्यात अनेक कठीण

**सक्सेस स्टोरी**

प्रसंग आले, मात्र त्यांनी कधीही हार मानली नाही. 13 ऑगस्ट 2024 रोजी त्यांचे वडील तथा माजी नगरसेवक सुनील जगताप यांचे निधन झाले. हा त्यांच्या आयुष्यातील मोठा धक्का होता. वडिलांच्या निधनानंतर संपूर्ण कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला होता.

प्रगती यांच्या कुटुंबात आई अंगणवाडी सेविका असून भाऊ रोहित असे लहान कुटुंब आहे. प्रगती या घरातील सर्वात मोठ्या असल्याने वडिलांच्या निधनानंतर कुटुंबाची जबाबदारीही त्यांच्या खांद्यावर आली. घरातील दुःखद परिस्थितीतही त्यांनी खचून न जाता कुटुंबाला आधार दिला आणि आपल्या स्वप्नांचा पाठपुरावा सुरू ठेवला. याच काळात त्यांनी राज्यसेवा २०२४ च्या परीक्षेत मुलाखतीपर्यंत मजल मारली होती. मात्र, त्याच दरम्यान त्यांना कावीळ झाल्याने प्रकृती खालावली आणि त्यांना आयसीयूमध्ये दाखल व्हावे लागले. अशा कठीण परिस्थितीतही त्यांनी हार मानली नाही आणि पुन्हा उभे राहत परीक्षेची तयारी सुरू ठेवली.

**प्रेरणादायी ‘प्रगती’ची कहाणी**

आरोग्याच्या अडचणींवर मात करत प्रगती जगताप यांनी अखेर एमपीएससी राज्यसेवा परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले. अनुसूचित जातीतील महिलांमध्ये राज्यात प्रथम येत त्यांनी सहाय्यक आयुक्त / मुख्याधिकारी या वर्ग-१ पदासाठी निवड मिळविली आहे. त्यांच्या या यशामुळे अकोल्यासह संपूर्ण राज्यात त्यांच्या नावाची चर्चा होत आहे. विशेष म्हणजे कृषी सेवक ते सहाय्यक आयुक्त असा त्यांचा प्रवास अत्यंत प्रेरणादायी मानला जात आहे. ग्रामीण आणि सामान्य कुटुंबातून आलेल्या विद्यार्थ्यांसाठी त्यांची कहाणी संघर्षातून यश मिळविण्याचे उदाहरण ठरत आहे. स्पर्धा परीक्षा देणाऱ्या अनेक तरुण-तरुणींना त्यांच्या यशातून नवी प्रेरणा मिळत आहे. दरम्यान, इतके मोठे यश मिळवूनही ‘प्रगती’ यांच्या मनात एक खंत कायम आहे. त्यांच्या या यशाचा आनंद पाहण्यासाठी त्यांचे वडील आज या जगात नाहीत, याची खंत त्या व्यक्त करत आहेत. मात्र, त्यांच्या संघर्ष, जिद्द आणि मेहनतीमुळे प्रगती जगताप या आज राज्यसेवेत उच्च पदावर पोहोचल्या असून अकोल्यासाठी

# एक उपाय केल्यास साप आयुष्यभर घराभोवती दृष्टीसच पडणार नाही!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पावसाळ्याच्या तोंडावर घराच्या आसपास साप येत असतील, तर फक्त घरगुती पद्धतीने बनवा एक स्प्रे. आयुष्यभर परत कधीच घराच्या आसपास देखील साप दिसणार नाही.

पावसाळ्याच्या दिवसांमध्ये घराच्या आजूबाजूला किंवा बागेत साप दिसणे ही सामान्य गोष्ट आहे. मात्र, अचानक साप दिसल्यावर घाबरणे स्वाभाविक असले तरी योग्य माहिती आणि खबरदारी घेतली तर ही परिस्थिती सहज हाताळता येऊ शकते. तज्ज्ञांच्या मते- साप दिसल्यास सुरक्षित अंतर ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. स्वतःहून साप पकडण्याचा प्रयत्न टाळावा. गरज भासल्यास रेस्क्यू टीमला संपर्क करणेच योग्य ठरते.

पावसाळ्यात ओलावा, झाडी आणि लपण्यासाठी जागा मिळाल्यामुळे साप बागांकडे आकर्षित होतात. त्यामुळे घराजवळील परिसर स्वच्छ ठेवणे. गवत-झाडांची वेळोवेळी छाटणी करणे आवश्यक आहे. नेफ्थलीनच्या गोळ्यांचा वापर सापांना दूर ठेवण्यासाठी केला जातो. हे तयार करण्यासाठी आपल्याला ४-४ नेफ्थलीन गोळ्या बारीक करून घ्याव्या लागतील. त्यात १-२ कप पाणी मिसळावे लागेल. तयार द्रावण बागेत, झाडांवर आणि घराच्या आसपास फवारा. याच्या तीव्र वासामुळे साप त्या भागापासून दूर राहतात. मात्र, हे द्रावण मुलांच्या हातापासून दूर ठेवणे गरजेचे आहे.

**अमोनियाची तीव्र वास सापांना असह्य**

अमोनियाचा वास साप सहन करू शकत नाहीत. हे तयार करण्यासाठी २-३ मोठे चमचे अमोनिया १-२ कप पाण्यात मिसळा. स्प्रे



बाटलीत भरून बागेत फवारणी करा. यामुळे साप आणि इतर कीटक दूर राहण्यास मदत होते.

**लवंग आणि दालचिनी तेलाचा उपयोग**

लवंग आणि दालचिनीच्या तेलाचा वासही सापांना दूर ठेवतो. २ चमचे लवंग तेल + दालचिनी तेल. ३ कप पाण्यात मिसळून स्प्रे तयार करा. हे मिश्रण बागेत फवारल्यास सापांसोबतच कीटकांची समस्याही कमी होते.

**घरगुती मिश्रणही उपयुक्त**

सिरका, लिंबाचा रस आणि बेकिंग सोडा यांचे मिश्रण तयार करून फवारणी केल्यास साप दूर राहण्यास मदत होते. योग्य काळजी आणि साध्या उपायांनी सापांचा धोका मोठ्या प्रमाणात कमी करता येतो. लक्षात ठेवा, की घाबरण्यापेक्षा सजग राहणे आणि सुरक्षिततेला प्राधान्य देणे हेच सर्वांत महत्त्वाचे आहे.

# प्रामाणिकता, संयम आणि लोकाभिमुखतेचा संगम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय राजकारणात स्वच्छ प्रतिमा, साधेपणा आणि जनतेशी असलेला आत्मीय संबंध यामुळे विशेष ओळख निर्माण करणाऱ्या सुमित्राताई महाजन यांचा जन्मदिन हा त्यांच्या कार्याचा गौरव करण्याचा आणि प्रेरणा घेण्याचा दिवस आहे. ‘ताई’ म्हणून सर्वत्र परिचित असलेल्या सुमित्राताई महाजन यांनी आपल्या दीर्घ राजकीय कारकिर्दीत प्रामाणिकपणा, संयम आणि लोकाभिमुखता यांचे उत्कृष्ट उदाहरण घालून दिले.



**जन्मदिन विशेष**

**प्रारंभिक जीवन आणि शिक्षण**

सुमित्राताई महाजन यांचा जन्म १२ एप्रिल १९४३ रोजी झाला. त्यांनी आपल्या शिक्षणकाळातच समाजकार्याची आवड जोपासली. कायद्याचे शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात सक्रिय सहभाग सुरू केला. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात शिस्त, संवेदनशीलता आणि ठामपणा यांचा सुंदर संगम दिसून येतो.

**राजकीय कारकीर्दीची सुरूवात**

महाजन यांनी भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून राजकारणात प्रवेश केला. त्यांनी इंदूर येथून सलग आठ वेळा लोकसभा निवडणूक जिंकून एक विक्रमच प्रस्थापित केला. जनतेशी असलेला त्यांचा जवळचा संपर्क, साधेपणाने मांडलेले प्रश्न आणि विकासासाठी केलेले सातत्यपूर्ण प्रयत्न यामुळे त्यांना मोठा लोकाधार मिळाला.

**लोकसभा अध्यक्ष म्हणून भूमिका**

२०१४ मध्ये त्या भारताच्या लोकसभेच्या अध्यक्षपदी विराजमान झाल्या. या पदावर काम करताना त्यांनी संसदीय कामकाज सुरळीत आणि शिस्तबद्ध पार पाडण्यासाठी विशेष प्रयत्न केले. त्यांच्या शांत, संयमी आणि न्याय्य भूमिकेमुळे संसदेत आदर्श वातावरण निर्माण झाले. विविध पक्षांतील सदस्यांशी समतोल राखत त्यांनी लोकशाही मूल्यांची जपणूक केली.

**कार्यशैली आणि व्यक्तिमत्त्व**

सुमित्रा महाजन यांच्या कार्यशैलीत साधेपणा आणि प्रामाणिकपणा ठळकपणे दिसतो. त्या नेहमीच लोकांच्या प्रश्नांना संवेदनशीलतेने प्रतिसाद देतात. त्यांच्या नेतृत्वात कठोरता नसून समजूतदारपणा आणि संवादाची ताकद आहे. त्यामुळेच त्या सर्वपक्षीय नेत्यांमध्ये आदराचे स्थान राखून आहेत.

**समाजासाठी योगदान**

राजकारणाबरोबरच त्यांनी सामाजिक कार्यालाही तितकेच महत्त्व दिले. महिला सक्षमीकरण, शिक्षण आणि सामाजिक समता यांसाठी त्यांनी अनेक उपक्रम राबवले. त्यांच्या कार्यामुळे अनेक महिलांना प्रेरणा मिळाली आणि समाजात सकारात्मक बदल घडून आले.

**प्रेरणादायी ठसा**

सुमित्रा महाजन यांचे आयुष्य हे संघर्ष, समर्पण आणि सेवाभाव यांचे प्रतीक आहे. त्यांनी दाखवून दिले की प्रामाणिकपणे काम केल्यास आणि लोकांच्या विश्वासाला पात्र ठरल्यास यश नक्कीच मिळते. त्यांच्या जन्मदिनानिमित्त त्यांच्या कार्याला मानाचा मुजरा करताना त्यांच्या आदर्शांचा वारसा पुढे नेण्याची प्रेरणा आपण सर्वांनी घ्यावी, हेच खरे त्यांना अभिवादन ठरेल.

# मुत्सद्देगिरी आणि कुंचल्याचा संगम : जयंत खोब्रागडे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

ज्याप्रमाणे ज्योत वातीला वेढून टाकते आणि संगीत आत्म्याला व्यापून घेते, अगदी तसेच जयंत एन. खोब्रागडे यांचे कॅनव्हास प्रेक्षकांच्या मनाला गवसणी घालतात. एकीकडे आंतरराष्ट्रीय राजकारणातील गुंतागुंत, देशाचे प्रतिनिधित्व करणारी मुत्सद्देगिरी आणि दुसरीकडे कुंचल्यातून साकारणारी निसर्गाची गूढ शांतता हे दोन टोकाचे प्रवाह खोब्रागडे यांच्या व्यक्तिमत्त्वात अत्यंत सुंदररीत्या एकवटले आहेत.

भारतीय परराष्ट्र सेवेतील



(आयएफएस) ३० वर्षांच्या प्रदीर्घ कारकिर्दीत अनेक देश पालथे घातल्यानंतरही त्यांच्यातील कलाकार कधीही विस्थापित झाला नाही. उलट तो प्रत्येक प्रवासागणिक अधिक समृद्ध होत गेला. राजदूतांनी स्वतः रेखाटलेल्या चित्रांचे विशेष प्रदर्शन ‘जर्नी विथ द डिव्हाईन फ्लो’ हे २७ मार्च ते ५ एप्रिल २०२६ दरम्यान दिल्ली येथील त्रावणकोर पॅलेसमध्ये झाले.

**धुळ्याच्या मातीतून जागतिक क्षितिजापर्यंत...**

जयंत खोब्रागडे यांच्या या जागतिक प्रवासाचे मूळ महाराष्ट्रातील धुळे शहरात रुजलेले आहे. त्यांचे शालेय शिक्षण धुळ्यातील ‘जयहिंद हायस्कूल’मध्ये झाले. याच शाळेच्या आवारात आणि खानदेशातील मातीत त्यांच्यातील जिज्ञासू वृत्ती आणि कलात्मक दृष्टी घडली. जयहिंद हायस्कूलमधील ते संस्कारच होते. ज्यांनी त्यांना पुढे रशिया, कझाकस्तान, इंडोनेशिया आणि आता स्पेनपर्यंतच्या प्रवासात आपले वेगळेपण जपण्याची ताकद दिली.

**प्रवासातून लाभलेली कलात्मक परिपक्वता**

परराष्ट्र सेवेतील अधिकाऱ्याचे जीवन म्हणजे वारंवार मुळासकट उखडले जाणे आणि नव्या जमिनीत पुन्हा रुजणे. मॉस्को ते माद्रिद आणि जकार्ता ते बिश्केक अशा प्रवासात जयंत यांच्या चित्रांमध्ये जो प्रामाणिकपणा आणि निरागसता दिसते ती त्यांच्या जागतिक अनुभवातून आली आहे. औपचारिक प्रशिक्षणाचा अभाव असूनही त्यांच्या कलाकृतींमध्ये जी खोली जाणवते ती जागतिक कलादालनांच्या निरीक्षणातून आणि स्वतःच्या सर्जनशीलतेशी असलेल्या प्रामाणिक नात्यातून आली आहे.

### जयंत खोब्रागडेंचा अल्प परिचय

- जयंत खोब्रागडे सध्या स्पेन आणि अंडोरा येथे भारताचे राजदूत (माद्रिद) आहेत.
- ३० वर्षांपेक्षा जादा काळ आयएफएस अधिकारी म्हणून रशिया, कझाकस्तान, किरगिझस्तान, इंडोनेशिया या देशांमध्ये सेवा.
- १९९३ पासून जगभरात ११ मोठी एकल प्रदर्शने.
- ‘Heartscapes’ नावाचे १०८ चित्रांचे पुस्तक प्रकाशित.
- स्वतः रेखाटलेल्या चित्रांचे विशेष प्रदर्शन ‘जर्नी विथ द डिव्हाईन फ्लो’.

**स्त्री रूप आणि निसर्ग सौंदर्याचा शोध**

जयंत यांच्या कलाकृतींमध्ये ‘स्त्री रूप’ हे केवळ आकृती म्हणून येत नाही, तर ते ‘श्रद्धा, आशा आणि प्रेम’ या उदात्त मूल्यांचे प्रतीक म्हणून येते. रशियन संकल्पनेतील या त्रयीचा प्रभाव त्यांच्या पात्रांवर स्पष्ट दिसतो. त्यांची चित्रे अंतर्मुख आहेत, स्वतःमध्येच मग्न आहेत, पण तरीही ती प्रेक्षकांशी संवाद साधतात. कधी ती पात्रे नृत्यात दंग असतात, कधी वाद्यांच्या सुरावटीत हरवलेली असतात,




तर कधी निसर्गाचाच एक भाग बनून फुले किंवा मधमाश्यांमध्ये रूपांतरीत होतात.

**निसर्ग : ईश्वरी अस्तित्वाचे ‘कुजबुजणारे’ माध्यम**

‘कुजबुजणारी पाने’ या विभागात निसर्ग हा केवळ देखावा उरत नाही, तर ते एका अदृश्य शक्तीचे प्रकटीकरण ठरते. जयंत यांच्या कुंचल्यातून उमटलेली झाडे आणि फुले जणू काही सृष्टीची गुपिते उघड करत आहेत, असे वाटते.

**सांस्कृतिक अनुबंध आणि देवत्वाचा प्रवास**

भारत आणि दक्षिण-पूर्व आशियातील सांस्कृतिक संबंधांनी जयंत यांच्या मनावर खोल ठसा उमटवला आहे. त्यांच्या ‘सांस्कृतिक अनुबंध’ या विभागात भारतीय देवतांच्या भव्य प्रतिमा पाहायला मिळतात. ससीम (मर्यादित) मानवाने असीमाची (अनंताची) घेतलेली ही एक शोधमोहीम आहे. त्यांच्यासाठी कला हा केवळ छंद नसून जीवनाचा अर्थ शोधण्याचा एक मार्ग आहे.

# ‘व्हरांड्यातही अनेकदा झोपलो, पण हार मानली नाही’

## आमदार निवासातील आठवणींत रमले महसूलमंत्री बावनकुळे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

राज्याच्या राजकारणात आणि प्रशासनात महसूलमंत्री म्हणून महत्त्वाची जबाबदारी सांभाळणारे चंद्रशेखर बावनकुळे यांचे भावनिक रूप नुकतेच पाहायला मिळाले. मंत्रालयातील कामाचा दिवसभराचा व्याप आटोपल्यानंतर रात्री आठच्या सुमारास ते आकाशवाणी आमदार निवासात पोहोचले. तेथे हे तेच ठिकाण आहे, जेथे बावनकुळे यांनी आपल्या राजकीय प्रवासातील तब्बल ११ वर्षे व्यतीत केली होती. तेथे ते दीड तास थांबले. अनेकांशी भेटले. गप्पा केल्या. सुख-दुःखांची देवाणघेवाण झाली. जुन्या आठवणींचा ओलावा आणि सहकाऱ्यांप्रती असलेला जिव्हाळा यावेळी त्यांच्या भेटीतून अधोरेखित झाला.

**सुरक्षारक्षकांशी गप्पा**

आमदार निवासात प्रवेश करताच त्यांनी प्रोटोकॉल बाजूला ठेवून तिथे तैनात असलेल्या सुरक्षारक्षकांशी गप्पा मारल्या. त्यानंतर थेट कँटीनमध्ये जाऊन तेथील कर्मचाऱ्यांची आस्थेने विचारपूस केली. ‘लोकांना चांगली सेवा द्या.. अन्नाचा दर्जा उत्तम ठेवा,’ अशा सूचनाही त्यांनी कर्मचाऱ्यांना दिल्या. केवळ मंत्री म्हणून नव्हे, तर तेथे वर्षानुवर्षे राहिलेला एक जुना हक्काचा माणूस म्हणून ते सर्वांशी संवाद साधत होते. लिफ्टने वर जात असताना लिफ्टमनशी केलेली आपुलकीची चर्चा उपस्थितांच्या मनाला स्पर्शून गेली.

**खोली क्रमांक ३१७ आणि तो संघर्ष**

जुन्या आठवणींना उजाळा देताना बावनकुळे काही काळ भावूक झाले होते. बावनकुळे आमदार निवासात आले ही बातमी क्षणभरात सर्वत्र पोहोचली आणि अनेक जण गोळा झाले. तेव्हा गप्पा करताना त्यांनी सांगितले, की ‘मी या आमदार निवासातील रूम नंबर ३१७ मध्ये राहायचो. अनेकदा गर्दी असायची, अशा वेळी जागा न मिळाल्याने कित्येक रात्री मी व्हरांड्यातही झोपून काढल्या आहेत. पण त्या संघर्षाच्या काळात कधीही हार मानली नाही. तोच अनुभव आणि कष्ट आज मला इथपर्यंत घेऊन आले आहेत.’

**जुन्या मित्रांची भेट आणि भावनिक संवाद**

सहाव्या मजल्यावरील रूम नंबर ६०१ मध्ये त्यांनी आमदार चरणसिहं ठाकूर आणि आमदार उमेश यावलकर यांच्यासह आपल्या काही जुन्या मित्रांची भेट घेतली. जुन्या गप्पा, तो काळ आणि सोबतचा प्रवास यावर मनमोकळी चर्चा झाली. निवासाबाहेर पडतानाही त्यांनी स्वागत कक्षातील कर्मचाऱ्यांशी संवाद साधला आणि ‘काही अडचण असल्यास नक्की सांगा,’ असा शब्द दिला.




शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम

सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे




# रघुनायकावीण वायां सिणावे...

## मना सज्जना...

परम स्नेही मित्रहो,
समर्थ सद्गुरूंचे स्मरण आणि प्रभू श्रीरामचंद्र यांच्या नामाचे चिंतन करण्याने मन प्रसन्न होते.

**श्लोक**

**रघुनायकावीण वायां सिणावे।**
**जना सारिखे वेर्थ का वोसणावे।**
**सदा सर्वदा नाम वाचे वसु दे।**
**अहंता मनी पापिणी ती नसू दे ॥ २४ ॥**

प्रभू श्रीरामचंद्रांचे चिंतन हा आपला रोजचा ध्यास असावा. श्वास असावा. सतत प्रभू श्रीराम आपल्याजवळ असल्याची कामना करावी. पण ती निरीच्छ भावनेने असावी. कोणताही अभिनिवेश किंवा अभिलाषा नसावी. श्वासांच्या येण्या-जाण्याच्या प्रवासाइतकी सहजता त्यात असावी.

भक्तीच्या मुळाशी स्वार्थी भावना नको. त्यातून काहीही साध्य होत नाही. लोकांप्रमाणे बडेजाव दर्शविणारी भक्ती नको. येथे समर्थ 'वोसणावे' असा चपखल शब्द वापरतात. याच अर्थ 'निरर्थक बरळणे' असा होतो. समर्पित भावाचा अभाव असलेल्या भक्तीतून काय बरे साध्य होईल? जनांच्या या स्वभावाचे चित्रण समर्थ दासबोधांच्या 'जनस्वभावनिरुपण' या समासात कठोर शब्दात करतात.

**जनांचा लालची स्वभाव।**
**आरंभीच म्हणती देव।**
**म्हणती मजला काही देव।**
**ऐसी वासना ॥**
**काहीं च भक्ति केली नसता।**
**आणि इच्छिती प्रसन्नता।**
**जैसे काहींचे सेवा न करिता।**
**स्वामीस मागती ॥**

पुढे समर्थ बोध करताना म्हणतात, काही एक कष्ट केल्याशिवाय जसे फळ मिळत नाही. तसेच भक्तीशिवाय इच्छित फलप्राप्तीही नाही.

**कष्टविना फळ नाही।**
**कष्टविना राज्य नाही।**
**केल्याविना होत नाही।**
**साध्य जनी ॥**
**आळसे काम नासते।**
**हे तो प्रत्ययास येते।**
**कष्टाकडे चुकाविते।**
**हीन जन ॥**

आळसाने काम नासते, हे ठाऊक असते. तरीही कष्ट टाळण्याचा मानवी स्वभाव आहे.

तेव्हा आळस न करता प्रभू श्रीरामचंद्रांचे स्मरण करावे. सदैव वाचेवर नाम असावे. हे करीत असताना मनात मात्र अहंकाराला ठाव देऊ नये. अहंकाराचा वारा जीवाला लागला की त्याच्या परमेश्वरप्राप्तीचा मार्ग खुंटला म्हणून समजावा.

पुढील श्लोकात समर्थ वास्तवाची जाणीव आपल्याला करून देतात.

मना विट मानू नको बोलण्याचा।
पुढे मागुता राम जोडेल कैसा।
सुखाची घडी लोटता सुख आहे।
पुढे सर्व जाईल काही न राहे ॥ २५॥

मनाने बोलण्याचा विट मानू नये असे या चरणात म्हटले आहे. याचा अर्थ मनाने सदैव श्रीराम नाम उच्चारणे हे कार्य कंटाळवाणे समजू नये.

या ठिकाणी मनाला जो उपदेश केला जातो आहे त्याचा देखील विट मानू नये. असा एक अर्थ घेतला जातो. तसे ते योग्य वाटते. कारण उपदेशपर बोलणे मनाला सहसा रुचत नाही. मानवी अहंकार दुखावला जातो. व्यक्ती दुर्लक्ष करते. हे एकप्रकारे आपणच आपलेच अहित करीत असतो. असे वाईट वाटून घेतले तर श्रीराम कृपेची पहाट आपल्या जीवनात कशी बरे उगवेल?

सुख-दुःखे येत-जात राहतात. ही जीवनगाथा आहेच. सुखाचा काळ असतो तेव्हा सारे सुख कारक वाटते. परंतु ही स्थिती सदा सर्वदा राहणार नाही. पुढे कसा काळ कंठत आयुष्य काढावे लागेल ते सांगता येणार नाही. ते आपल्या कल्पनेपलीकडील आहे.

**कोण समय येईल कैसा।**
**याचा न कळे किं भरवसा।**
**जैसे पक्षी दाही दिशा।**
**उडोन जाती ॥**
**तैसे वैभव हे सकळ।**
**कोण जाणे कैसी वेळ।**
**पुत्रकलत्रादि सकळ।**
**विघडोन जाती ॥**

**समर्थ या साऱ्यापासून सुटकेचा मंत्रही देतात. तो असा...**

**जयास वाटे सुखचि असावे।**
**तेणे रघुनाथ भजनी लागावे।**
**स्वजन सकळ ही त्यागावे।**
**दु:ख मूळ जे ॥**
**जय जय रघुवीर समर्थ!**



**– भाऊसाहेब देशमुख, अमळनेर**
**मो. : 94203 89541**

# प्रभात समयीच देवपूजा का करावी?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



देवाची पूजा सकाळीच करावी, असे शास्त्रांमध्ये सांगितले आहे. सकाळी उठल्यावर अंघोळ करून शूचिर्भूत होऊन देवाची पूजा केली जाते. सकाळी सूर्योदयाच्या वेळी पूजा करावी. या मुहूर्ताला ब्रह्ममुहूर्त म्हटले जाते.

**देवाची पूजा सकाळीच का केली जावी, यामागे शास्त्र आहे.**

१) सकाळी आपण जेव्हा उठतो तेव्हा आपण ताजेतवाने असतो. शरीर थकलेले नसते. त्यामुळे संपूर्ण दिवसात सकाळचीच वेळ उत्कृष्ट असते.

२) सकाळी आपले मनही शांत असते. मनात विचारांची गर्दी नसते.त्यामुळे मन एकाग्र करून आपण व्यवस्थित पूजा करू शकतो.

३) एकदा दिवस सुरू झाला, की आपली धावपळ सुरू होते, दगदग होते. यामुळे मनात वेगवेळे विचार सुरू होतात. काम करून आपण थकलेलो असतो, अंगातील उत्साह कमी झाला असतो. अशावेळी देवाच्या पूजेवेळी आपण एकाग्र चित्ताने पूजा करू शकत नाही.

४) सकाळी पूजा केल्यामुळे मनात पवित्र विचार येतात. मन शांत होते आणि समाधान लाभते. यामुळे दिवसभर काम करण्याची ऊर्जा मिळते. या सर्व कारणांमुळे शास्त्रांत ब्राह्ममुहूर्तावर म्हणजेच सकाळी पूजा करण्यास सांगितले आहे.

# जब भगवान् श्रीकृष्ण ने सुदामा जी को...

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जब भगवान् श्रीकृष्ण ने सुदामा जी को तीनों लोकों का स्वामी बना दिया तो, सुदामा जी की संपत्ति देखकर यमराज से रहा न गया और यम भगवान् को नियम कानूनों का पाठ पढ़ाने के लिए अपने बहीखाते लेकर द्वारिका पहुंच गये। और भगवान् से कहने लगे कि- अपराध क्षमा करें भगवन लेकिन सत्य तो ये है कि यमपुरी में शायद अब मेरी कोई आवश्यकता नही रह गयी है। इसलिए में पृथ्वी लोक के प्राणियों के कर्मों का बही खाता आपको सौंपने आया हूँ और इस प्रकार यमराज ने सारे बहीखाते भगवान् के सामने रख दिये। भगवान् मुस्कुराए और बोले यमराज जी आखिर ऐसी क्या बात है जो इतना चिंतित लग रहे हो। यमराज कहने लगे कि प्रभु आपके क्षमा कर देने से अनेक पापी एक तो यमपुरी आते ही नही है वे सीधे ही आपके धाम को चले जाते हैं और। फिर आपने अभी अभी सुदामा जी को तीनों लोक दान दे दिए हैं सो अब हम कहाँ जाएं। यमराज भगवान् से कहने लगे कि प्रभु सुदामा जी के प्रारब्ध में तो जीवन भर दरिद्रता ही लिखी हुई थी। लेकिन आपने उन्हें तीनों लोकों की संपत्ति देकर विधि के बनाये हुए विधान को ही बदलकर रख दिया है। अब कर्मों की प्रधानता तो लगभग समाप्त ही हो गयी है। भगवान् बोले कि यम तुमने कैसे जाना कि सुदामा के भाग्य में आजीवन दरिद्रता का योग है। यमराज ने अपना बही खाता खोला तो सुदामा जी के भाग्य वाले स्थान पर देखा तो चकित रह गए। देखते हैं कि जहां 'श्रीक्षय' सम्पत्ति का क्षय लिखा हुआ था, वहां स्वयं भगवान् श्रीकृष्ण ने उन्ही अक्षरों को उलटकर उनके स्थान पर 'यक्षश्री' लिख दिया अर्थात कुबेर की संपत्ति,भगवान् बोले कि यमराज जी शायद आपकी जानकारी पूरी नही है। क्या आप जानते हैं कि सुदामा ने मुझे अपना सर्वस्व अर्पण कर दिया था तो मैने तो सुदामा के केवल उसी उपकार का प्रतिफल उसे दिया है, यमराज बोले कि भगवान् ऐसी कोन सी सम्पत्ति सुदामा ने आपको अर्पण कर दी उसके पास तो कुछ भी नही। भगवान् बोले कि सुदामा ने अपनी कुल पूंजी के रूप में बड़े ही प्रेम से मुझे चावल अर्पण किये थे जो मैंने और देवी लक्ष्मी ने बड़े प्रेम से खाये थे, और जो मुझे प्रेम से कुछ खिलाता है उसे सम्पूर्ण विश्व को भोजन कराने जितना पुण्य प्राप्त होता है, बस उसी का प्रतिफल सुदामा को मैंने दिया है। ऐसे दयालु हैं हमारे प्रभु श्री द्वारिकाधीश भगवान। जिन्होंने न केवल सुदामा जी पर कृपा की, बल्कि द्रौपदी की बटलोई से बचे हुए साग के पत्ते को भी बड़े चाव से खाकर दुर्वासा ऋषि और उनके शिष्यों सहित सम्पूर्ण विश्व को तृप्त कर दिया था ओर पांडवो को श्राप से बचाया था।

**बोलिये द्वारिकाधीश भगवान की जय हो..**



# श्री जोतिबा हे बद्रिकेदारचेच रूप!

## जोतिबाच्या नावानं चांगभलं!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

श्री जोतिबा अथवा केदारेश्वर हे बद्रिकेदारेचेच रूप आहे. ब्रह्मा, विष्णू, महेश आणि जमदग्नीचा क्रोधांश या सर्वांचा मिळून एक तेजोःपुंज अवतार म्हणजेच केदारनाथ किंवा जोतिबा. 'जोतिबा' या नावाची उत्पत्ती 'ज्योत' या शब्दापासून झाली आहे. ज्योत म्हणजे तेज, प्रकाश. वायू, तेज, आप (पाणी), आकाश व पृथ्वी या पंचमहाभूतांपैकी 'तेजाचे' शक्तींदैवत म्हणजेच वाडीरत्नागिरी जोतिबा. पौगंड ऋषींच्या वंशाला दिवा नव्हता. त्यांनी तपश्चर्या करून बद्रीनाथांना संतुष्ट केले. बद्रीनाथांनी पौगंड ऋषी या त्यांची पत्नी विमलांबुजा यांच्यापोटी जन्माला येण्याचे वचन दिले. त्याप्रमाणे चैत्र शुद्ध षष्टी युक्त सप्तमीच्या दिवशी रविवारी सूर्योदयाला विमलांबुजेच्या ओंजळीत नाथ, ज्योती रूपात प्रगटले. पुढे विमलांबुजेचा भाव जाणून आठ वर्षांचे बटू म्हणून प्रगटले.

### उत्तरेचा देव दक्षिणी आला :

कोल्हापूरच्या श्री महालक्ष्मीला, दैत्यसंहाराच्या संग्रामात सहाय्य करण्यासाठी जोतिबा हिमालयातून दक्षिणेत आला, अशी कथा केदारविजयात दिलेली आहे. 'जोतिबा' हे 'ज्योतिर्लिंग' या नावाने लोकसंस्करण आहे. 'जोतिबाची' मूर्ती चतुर्भुज, हातात ख, डमरू, त्रिशूल अमृतपात्र या आयुधांसह आहे. अश्व हे त्याचे वाहन आहे. धर्मरक्षणार्थ आवतारपुरुष जन्म घेतात, अशी एक समजूत आहे. जोतिबांच्या मागे अशीच पार्श्वभूमी आहे. रत्नासूर आणि कोल्हासूर या राक्षसांनी अनाचार सुरु केला. करवीरवासीयांनी या दैत्यांचा त्रास होत असे, म्हणून देवी महालक्ष्मी यांनी केदारनाथांचा धावा केला. तेव्हा केदारनाथांनी जोतिबांचे रूप घेऊन त्यांचा नायनाट केला. अकरा दिवसांच्या घनघोर संग्रामानंतर श्री जोतिबांनी श्री चर्पटअंबेच्या म्हणजेच चोपडाईच्या सहाय्याने रत्नासुराचा त्रिशूळाने वध केला. तेव्हा लोकांनी आनंदाने "चां S S ग भलं - चां S S ग भलं " असा एकच जयघोष केला.

### मंदिराचा पूर्वइतिहास

जोतिबांचे आज जे मोठे मंदिर दिसते त्या ठिकाणी पूर्वी छोटेसे देवालय होते. हे मूळ मंदिर कराडनजीच्या किवळ येतील नावजी नामक भक्ताने बांधले व त्यानंतर आजचे जे देवालय आहे ते इ. स. १७३० मध्ये ग्वाल्हेरचे महाराज राणोजी शिंदे यांनी मूळच्या ठिकाणी भव्य स्वरूपात पुर्नचित करून बांधले. हे मंदिर साधे असून त्याचे बांधकाम उत्तम प्रतीच्या काळ्या बेसाल्ट दगडात करण्यात आले आहे.

दुसरे केदारेश्वराचे देवालय, विशेष म्हणजे ते खांबांच्या आधाराशिवाय उभे आहे. हे मंदिर १५५ वर्षांपूर्वी म्हणजे इ.स.१८०८ मध्ये दौलतराव शिंदे यांनी बांधले. केदारलिंग व केदारेश्वर यामध्ये चर्पटअंबा म्हणचे चोपडाईचे देवालय आहे. ते इ.स. १७५० मध्ये प्रीतीराव चव्हाण, हिंमतबहादूर यांनी बांधले. या तीन देवळांचा एक गट होतो.

चौथे रामेश्वराचे देवालय, हे इ.स. १७८० मध्ये मालजी निकम, पन्हाळकर यांनी बांधले. केदारेश्वरसमोर एका लहानशा चौथऱ्यावर दोन काळ्या दगडात नंदी आहेत. हेही दौलतराव शिंदे यांनी बसविले. देवालयाचे पूर्वेकडील बाहेरील बाजूस सटवाई पूर्वाभिमुख आहे. पश्चिमेस रामलिंग पूर्वाभिमुख आहेत. देवालयाचे भिंतीवर पाच, सहा ठिकाणी वीरगळ दगडही बसविले आहेत.

### सावनेरचे नवनाथ दत्त मंदिर

"श्री केदारनाथाने जोतिबा डोंगराभोवती बारा ज्योतिर्लिंग स्थापन केले म्हणून त्यांना 'ज्योतिर्लिंग' असेही म्हणतात. बारा ज्योतिर्लिंगांची स्थापना करताना त्यांनी सर्व प्रथम त्यांच्या मूळ अवतीर्ण ठिकाणाचे स्मरण म्हणून हिमालयातील केदारेश्वर लिंग स्थापन केले म्हणून त्यांना केदारलिंग असेही म्हणतात."

### जोतिबाचा लवाजमा : मानाचे उंट घोडे

श्रीक्षेत्र जोतिबा डोंगरावर दख्खनचा राजा श्री जोतिबाच्या धार्मिक विधीत उंट, घोडा, हत्ती या मानाच्या प्राण्यांना पूर्वीपासून मोठा मान आहे. पालखी सोहळे, पूजा-अर्चा, धुपारती सोहळा यात उंट, घोडा, हत्ती यांचा सहभाग असतो. जोतिबाचे वाहन म्हणून घोड्यास मान आहे. प्रत्येक शनिवारी जोतिबाची घोड्यावर बसलेली पूजा बांधली जाते. यावेळी मानाचा घोडा मंदिराच्या मुख्य कमानीत ( नावजींची कमान ) पूजा उतरेपर्यंत उभा करण्यात येतो. दर रविवारी दुपारी बारा वाजता व रात्री साडे आठ वाजता निघणाऱ्या पालखी सोहळ्यासमोर हे मानाचे प्राणी सजवून खडे केलेले असतात. जोतिबाच्या चैत्र यात्रेत तर या प्राण्यांवर गुलाल, खोबरे, खारीक यांची प्रचंड उधळण होते.

### श्री जोतिबाचे वस्त्र व अलंकार

श्री जोतिबा देवाची मूर्ती स्थानिक काळ्या पाषाणात घडवलेली असून ती साधारणपणे ४ फूट ३ इंच उंचीची आहे. मूर्ती चतुर्भुज असून क्रमणपद अर्थात डावा पाय किंचीत पुढे टाकलेल्या स्थितीत उभी आहे. उजव्या हातात ख, वर डमरू डावीकडे त्रिशूल आणि खाली अमृत पात्र असून कमरेला पंचा असून गळ्यात कंठहार आहे. माथ्याला नऊ वेटोळ्याची जटा आहे. हातात कडे आणि पायांत तोडे असून कानात नाथपंथी गोल कुंडलं आहेत. दररोज श्रींच्या वस्त्रालंकाराने सालंकृत पूजा बांधल्या जातात. श्रींच्या खड्या पूजेस डोईस मराठेशाही पगडी, बारा बंदी अंगरखा, शेला असा वेश असतो. अंगावर सोन्याचे विविध दागिने असतात. पायात सोन्याचे तोडे, हातांच्या बोटात हिरेजडित अंगठ्या असतात. गळ्यात सोन्याच्या विविध माळा, डोईस शिरपेच असे अलंकार असतात.

### दख्खनच्या राजाला तोफेची सलामी

जोतिबा डोंगरावर महत्त्वाच्या सोहळ्यावेळी तोफेची सलामी दिली जाते. दर रविवार व पौर्णिमेच्या दिवशी पालखी सोहळा होतो. यावेळी रात्री नऊ वाजता तोफेची सलामी दिली जाते. विजया दशमीदिवशी सोने लुटण्याच्या कार्यक्रमावेळी सायंकाळी सहा वाजता पाच वेळा तोफेची सलामी दिली जाते. चैत्र यात्रा काळात मुख्य मंदिराच्या परिसरात दोन वेळा तर यमाई मंदिराच्या परिसरात एक वेळा सलामी दिली जाते. गुढी पाडव्याला पंचांग वाचण्यापूर्वी, रामनवमी, श्रीकृष्ण जन्माष्टमी, काळभैरव जयंती या दिवशी तोफची सलामी दिली जाते.



### नंदीचे देवालय

जोतिबा मंदिर परिसरात केदारनाथांच्या देवालयाशिवाय इतर काही वैशिष्ट्यपूर्ण अशा मंदिरांचा समूह आहे. यातीलच नंदीचे हे देवालय होय. या मंदिराचे वैशिष्ट्यं असे कि, हे मंदिर दक्षिणाभिमुख आहे. तसेच या ठिकाणी एका ऐवजी दोन नंदी आहेत. हे दोन्ही नंदी काळ्या दगडातील आहेत. असे मंदिर क्वचित ठिकाणीच आढळते. हे मंदिर ग्वाल्हेरच्या शिंदे घराण्यातील दौलतराव शिंदे यांनी इ. स. 1808 मध्ये बांधले.

### महादेवाचे मंदिर

नंदी मंदिरासमोर महादेवाचे मंदिर दिसते ते उत्तराभिमुख आहे. या मंदिराच्या आतील मंडपाला आधारासाठी एकही खांब नाही. हा स्थापत्य कलेचा उत्कृष्ट नमुना म्हणता येईल. मंदिराच्या आतील गाभाऱ्यात केदारेश्वर, काशी विश्वनाथ ही केदारेश्वर लिंगे आहेत. श्री केदारनाथाने आपल्या भक्तांसाठी या डोंगरावर बारा ज्योतिर्लिंगे स्थापन केली. त्यातील पहिले लिंग म्हणजे केदारनाथ. या लिंगाच्या पूर्वेकडील बाजूस आणखी एक लिंग असून त्यास काशी विश्वनाथ असे म्हणतात. हे मंदिर बांधताना ग्वाल्हेरच्या शिंदे यांनी नर्मदेहून आणलेल्या लिंगाची स्थापना केली. या तीन लिंगांनी स्थापित हे मंदिर अध्यात्मशास्त्र व उत्कृष्ट स्थापत्य कला यांचा एक दुर्मिळ व उत्कृष्ट आविष्कार म्हणता येईल.

### चोपडाई देवी मंदिर

श्री महादेव मंदिराला जोडूनच आदिमाया चोपडाई देवीचे मंदिर आहे. हे मंदिर कलात्मक व वैशिष्ट्यपूर्ण असून देवी पश्चिमाभिमुख उभी आहे. हे मंदिर हेमाडपंथी शैलीतील असून केदारेश्वराच्या मंदिरापेक्षा दाक्षिणात्य पद्धतीचे आहे. श्री केदारनाथांच्या दक्षिण मोहिमेमध्ये ज्या आदिमाया शक्तींनी केदारनाथांना साह्य केले त्यांतील एक आदिशक्ती चोपडाई देवी ( चर्पट आंबा ) हि महिषासुरमर्दिनी दुर्गा यांचेच हे प्रकट रूप आहे. देवीच्या समोर मंडपात चार खांब असून ते चारीही पुरुषार्थांचे अंग आहे.

जोतिबा मंदिराच्या सभोवती जोतिबाचे अष्टप्रधान म्हणजेच अष्टभैरव यांची स्थापना केलेली आढळते. यामध्ये काळभैरव, बाळ भैरव, सुवर्ण भैरव, गंड भैरव , आकाश भैरव, कल्पांत भैरव आहेत. अष्ट भैरवांशिवाय आदिनाथ, रामेश्वर, शंख भैरव आदी देवतांची स्थापना मंदिर परिसरात झाली आहे. जोतिबा मंदिर परिसरात हरिनारायणाचे लहान मंदिर आहे.

### काळभैरव

केदारनाथांच्या अवतार कार्यात काळभैरव यांनी अलौकिक व महत्वपूर्ण कामगिरी पार पाडली म्हणून करवीर निवासिनी महालक्ष्मी यांनी भैरवसेनेच्या सरसेनापतिपदी त्यांची निवड केली. केदारनाथांनी अवतार धारण केल्यानंतर महालक्ष्मीच्या विनंतीवरून दक्षिण दिग्विजयी मोहिमेला प्रारंभ काशीतून केला. त्यावेळी श्री काळभैरवांनी या अलौकिक कार्यात सहभागी करून घेण्याची विनंती केली. केदारनाथांनी त्यांची विनंती आनंदाने मान्य करून त्यांना दक्षिण मोहिमेत सहभागी करून घेतले. पुढे तोरण भैरव रत्नासुराला मिळाल्यानंतर महालक्ष्मीने केदारनाथांना काळभैरवांना भैरव सेनेचे सेनापती करावे, असे सुचविले. त्याप्रमाणे त्यांना भैरव सेनेचा सरसेनापती केले. काळभैरवाने आपल्या अलौकिक पराक्रमाने दक्षिण मोहीम यशस्वी करण्यात सिंहाचा वाटा उचलला. अनेक बलाढ्य राक्षसांचा नि:पात केला व त्या ठिकाणी तीर्थांची स्थापना केली.

काळभैरव हा शिवशंकराच्या अंशापासून उत्पन्न झालेला प्रखर व तेजस्वी अवतार आहे. काळभैरवाचे रूप मोठे लोभसवाणे आहे. चतुर्भुज मूर्ती, हातात त्रिशूल, डमरू, ख व अमृतपात्र असून ते केदारनाथांप्रमाणे उभे आहेत. काळभैरव भैरवांचा नायक व रत्नागिरी पर्वताचा म्हणजे श्री क्षेत्र वाडी रत्नागिरीचा क्षेत्रपाल व दंडकंधारी आहे. असा क्षेत्रपाल महाकाळ धुंडिराज काळभैरव या वाडी रत्नागिरीवर रक्षकरूपी वैभव असून या क्षेत्राचा अधिपती असल्याने नारळ वाढविण्याचा मान त्यांना दिला आहे.

नावजी बुवांबद्दल

जोतिबाच्या मुख्य मंदिरातून बाहेर आल्यावर दक्षिणद्वारापुढे जेथे कापूर-अगरबत्ती लावली जाते, त्या पायरीला लागून असलेली आडवी मूर्ती म्हणजे केदारनाथांचे परम भक्त नावजी यांचे स्थान. नावजी हे कराड मधील किवळ गावाचे रहिवाशी होते. प्राचीन ग्रंथातील उल्लेखानुसार नावजीनीं श्रींचे देवालय नव्याने बांधले व त्यावर सुवर्णकलश चढवला. नावजींनी केदारनाथांची भक्ती कोणतीही अपेक्षा न ठेवता निष्काम भावनेने केली व देवाच्या दारी पायरीजवळ अजरामर होऊन राहण्याचा सन्मान त्यांना मिळाला.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)